"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, शिक्षण विभाग,
जा.क्रं. शिक्षण/माध्य/अनुदान/ह ४/८९-९०
पुणे-११. दिनांक :- २५।९।८९

प्रति,

मुख्याध्यापक,

~~बी आर अग्रवाल हायस्कूल~~

~~१०८८ रविवार पेठ,~~ पुणे ४११००२.

विषय :- शासनमान्य विना अनुदानित पात्र माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त)अनुदान मंजूर करणे बाबत.

संदर्भ :- १)शासन निर्णय क्रं.एसएसएन/१०८८/१६६९-एन/माशि-१, दि. १०.३.८९,
२)शिक्षण संचालनालयाचे क्रं.अमाशा/१०८८/३२०३७/१५ क, दि. २४.३.८९ चे परिपत्रक,
३)शिक्षण संचालनालयाचे क्रं. अमाशा/१०८९/३२०३७/१५ क दि. १७.८.८९ चे परिपत्रक.

. . . .

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ नुसार दि. १.१०.८८ ते दि. २८.२.८९ या कालावधी साठी सोबत जोडलेल्या यादीतील माध्यमिक शाळांना ७५%, ५० % व २५ % अनुदान मंजूर करण्यात आले होते. संदर्भ क्रं. ३ नुसार सोबत १०० %, ७५ % व ५० % अनुदान पात्र शाळांची यादी जोडली आहे.

ज्या शाळांना मागील वर्षी २५ %, ५० %, ७५ % अनुदान मिळाले अशा शाळांची मार्च, ८९ च्या परीक्षेस ~~बसल~~ नियमीत विद्यार्थी म्हणून बसलेल्यांची शाळांत परीक्षेच्या निकालाची टक्केवारी विहित निकषानुसार असल्यास त्या शाळांना त्यांच्या मान्य वेतन व वेतनेतर खर्चावर अनुक्रमे ५० %, ७५ % व १०० % अनुदान देय आहे.

ज्या शाळाचे मार्च,८९ शालांत परीक्षेस नियमित विद्यार्थी म्हणून बसलेल्यांची निकालाची टक्केवारी विहित निकषानुसार नाही त्यांना मागील वर्षाच्या दरानेच अनुदान देय आहे. तरी आपण १ मार्च,८९ पासून आपल्याकडे सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक मान्यता या कार्यालयाकडून घेऊन वेतन देयके वेतन पथकाकडे सादर करावीत. अदयापही सेवक संख्या निश्चिती व नेमणूक आपण घेतली नसेल तर तसे प्रस्ताव या कार्यालयास सादर करुन संख्या निश्चिती व नेमणूकांना मान्यता घ्यावी. व त्यानंतर वेतने देयके वेतन पथकाकडे नियमित सादर करावीत.

. . २ . .

ब. रा. अग्रवाल हिंदी विद्यालय

सेवक संख्या निश्चती करण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीमध्ये आपल्या विद्यालयात मान्य असणाऱ्या तुकड्यांचाच विचार केला जाईल. जर आपल्या विद्यालयास या संख्येपेक्षा जास्त तुकड्या या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आल्या असल्या तरी त्या तूर्त विना अनुदान तत्वावर राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी कृपया वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन वेतन देयके वेतन पथकाकडे त्वरीत सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

स्थळ प्रत शि.अ.यांनी मान्य केली असे.

शिक्षणाधिकारी [माध्य]
पुणे जिल्हा परिषद, पुणे. यांचेकरिता

प्रत,
अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाही साठी अग्रेषित.

संबंधित शाळांच्या वेतनावरील शाळांचा खर्च खाली दर्शविलेल्या अर्थ शीर्षाखाली १९८९-९० या वर्षासाठी केलेल्या तरतूदीतून भागवावा.

१] बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रातील माध्यमिक शाळा-

"२२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११० बिन सरकारी माध्यमिक शाळांना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [ए][बी] सर्वसाधारण माध्य. शाळांच्या विकासासाठी सहाय्यक अनुदान [२२०२ ०४ ८७]"मागणी क्रं. इ-३.

२] आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळा-

"२२०२ सर्वसाधारण शिक्षण- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- जनजाती क्षेत्र उपयोजना- ०२ माध्यमिक शिक्षण, ११० अशासकीय व माध्यमिक शाळांना सहाय्य [ए]राज्य योजनांतर्गत योजना, [१] जनजाती क्षेत्रात अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे, त्यांच्या विकास व विस्तार करणे, सहाय्यक अनुदान/ अर्धसहाय्यक/अंशदान [२२०२ १८ ८६]" मागणी क्रं. टी-६.

स्थळप्रत मा शि अ. यांनी मान्य केली आहे.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जि.प.पुणे-११. करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
१] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे-१.
२] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१.

दि.१.३.८९ पासून १०० टक्के अनुदान प्राप्त शाळांची यादी

( इकडील पत्र क्र. शिक्षण/माध्य/अनुदान/ह ४/ १९८९-९० दि.२१.८.८९ लगत (पुरवणी) यादी

| अ.क्र. १ | शाळेचे नाव व पत्ता २ | माध्यम ३ | इयत्ता ४ | एकुण तुकडया ५ |
|---|---|---|---|---|
| १. | बी.आर.आगरवाल हाय. पुणे-२ | हिंदी | ८ ते १० | ३ |
| २. | ओम. गोदावरी हाय. चिंचवड पुणे-१९ | हिंदी | ५ ते १०वी | १२ |
| ३. | नंदादीप हाय. पर्वती पुणे-९ | मराठी | ८ ते १० | ६ |
| ४. | ज्ञान प्रबोधिनी हाय. निगडी पुणे-३५ | मराठी | ५ ते १० | १२ |
| ५. | नॅशनल उर्दू हाय. दौंड | उर्दू | ८ते१० | ३ |
| ६. | सिध्देश्वर विद्यालय, नायगाव ता.पुरंधर | मराठी | ८ते१० | ३ |
| ७. | हरि उध्दव धोत्रे माध्य. विद्या. फुलगाव ता. हवेली | मराठी | ८ ते १० | ३ |
| ८. | श्री पांडुरंग विद्यालय विठ्ठलवाडी ता. शिरुर | मराठी | ८ते १० | ३ |
| ९. | नवीन माध्यमिक विद्या. मरकळ ता.खेड | मराठी | ८ ते १० | ३ |
| १०. | न्यू इंग्लिश स्कूल संगमनेर ता. भोर | मराठी | ८ ते१० | ६ |
| ११. | विठ्ठल माध्य. विद्या. भिकोबानगर ता. बारामती | मराठी | ८ ते १० | ४ |
| १२. | आदीवासी शि.प्र.मंडळ चोटवडी ता.खेड | मराठी | ५ ते १० | ६ |

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे. करिता

स्थळ प्रत शि.अ. यांनी मान्य केली असे.

... अग्रवाल हिंदी विद्यालय